# पदभरती बाबत सुचना

## एनयुएचएम पदभरती अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांच्या शैक्षणिक, अनुभव व इतर मुळ कागदपत्र तपासणी वेळापत्रक

दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई अंतर्गत कंत्राटी पदांकरीता ऑनलाईन प्रणाली द्वारे प्राप्त अर्ज व कागदपत्राच्या छाननी अंती व जाहिरात मधील शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या निकषानुसार खालील पदनिहाय नमूद उमेदवारांची अंतीम पात्र व अपात्र यादी दिनांक १ डिसेंबर २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने, जाहिरातीतील नमूद कंत्राटी पदांची अंतीम निवड यादी दिनांक ७ डिसेंबर २०२३ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

त्यानुसार निवड यादी ( Selected) मधील उमेदवारांची मुळ प्रमाणपत्र पडताळणी करीता दिनांक १४ डिसेंबर २३ ते दिनांक १५ डिसेंबर २३ या कालावधीत खालील तक्त्यांत दिलेल्या तपशिलानुसार पदनिहाय व दिनांकानुसार कार्यालयीन वेळेत सकाळी १०.३० वाजता आरोग्य भवन, मुंबई कार्यालयात उपस्थित राहून मुळ कागदपत्र पडताळणी प्रक्रिया पुर्ण करुन घ्यावी. तरी, निवड झालेल्या उमेदवारांनी शैक्षणिक व अनुभवाच्या मुळे प्रमाणपत्रासह व आपल्या कागदपत्रांच्या एक संच स्वसांक्षाकित ( Self Attested) करुन कागदपत्र पडताळणीस उपस्थित रहावे. यासाठी लागणारा प्रवास खर्च वा इतर कोणतेही भत्ते उमेदवारास देय राहणार नाही. मुळ कागदपत्र पडताळणीस अनुपस्थित उमेदवारांची कोणत्याही प्रकारची सबब / तक्रार एकूण घेतली जाणार नाही. तसेच सदर पदांकरीता जाहिरातीत नमूद आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव तसेच मुळ कागदपत्र पडताळणी दरम्यान ऑनलाईन अर्जामधील माहिती व उमेदवारांनी प्रत्यक्ष सादर केलेली माहिती या मध्ये तफावत / विसंगती आढळल्यास आपणास सदर पदावरील नियुक्ती / उमेदवारी देण्यात येणार नाही. अथवा कोणत्याही क्षणी नियुक्ती रदद करण्यात येईल याची उमेदवारांनी गांर्भियाने नोंद घ्यावी. वेळापत्रक खालील प्रमाणे..

एनयुएचएम पदभरती अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांच्या शैक्षणिक, अनुभव व इतर प्रमाणपत्रे तपासणी वेळापत्रक

| अ अनु.क्र. | पदाचे नांव | कागदपत्रे तपासणी दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | शहर कार्यक्रम व्यवस्थापक | दिनांक १४ डिसेंबर २३ | सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यत |
| २ | शहर गुणवत्ता आश्वासन समन्वयक | दिनांक १४ डिसेंबर २३ | |
| ४ | शहर लेखा व्यवस्थापक | दिनांक १४ डिसेंबर २३ | |
| ५ | लेखापाल | दिनांक १४ डिसेंबर २३ | |
| ३ | सार्वजनिक आरोग्य व्यवसथापक | दिनांक १५ डिसेंबर २३ | |